आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२० ऑगस्ट २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सागरी सुरक्षा क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी भारत आणि जपानमध्ये सामंजस्य करार

- दिल्लीसाठीचा बृहत आराखडा केंद्र सरकारकडून जाहीर

- नीट पेपरफुटी प्रकरणातल्या आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या चौकशीसाठीच्या समिती सदस्यांची सर्वोच्च न्यायालयाकडून घोषणा

- बांगलादेश राष्ट्रपतीपदी नॅशनॅलिस्ट पार्टीचे मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर विजयी

**आणि**

- बॅडमिंटन विश्व चषक स्पर्धेत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत

**<><><><><>**

भारत आणि जपाननं सागरी सुरक्षेच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी सामंजस्य करारावर आज स्वाक्षरी केली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि जपानचे संरक्षण मंत्री शिनजिरो कोईझुमी यांच्या नवी दिल्लीत चर्चा झाली. त्यानंतर हा सामंजस्य करार झाला. जागतिक पातळीवर जलवाहतुकीत येणाऱ्या अडथळ्यांविषयी राजनाथ सिंग यांनी चिंता व्यक्त केली.

**होल्ड - राजनाथ सिंग**

**<><><><><>**

केंद्र सरकारनं दिल्लीसाठीचा मास्टर प्लान अर्थात बृहत आराखडा २०४७ आज प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार ४० लाख घरांची बांधणी, उंच इमारती, मेट्रोचं जाळं ६४० किलोमीटरपर्यंत वाढवणं यासारखे प्रस्ताव यात मांडले आहेत. दिल्लीचे

नायब राज्यपाल टी. एस. संधू, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्री मनोहर लाल यावेळी उपस्थित होते. दिल्लीतले ठराविक भाग वगळता इतरत्र उंच इमारतींवरचे निर्बंध सरकारनं हटवले आहेत.

<><><><>

इयत्ता ६ वीपासून रोजगारक्षमता आणि नवोन्मेष कौशल्य प्रशिक्षण, तर ९ वीपासून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करायचा प्रस्ताव नीती आयोगानं मांडला आहे. मुलांमध्ये कौशल्यविकास लवकर सुरू व्हावा आणि त्यासाठी यांचा समावेश शालेय शिक्षणातच व्हावा, असं आयोगानं म्हटलं आहे. तसंच सामान्य रोजगारक्षमता आणि नवोन्मेष कौशल्य हा विषय ११वी आणि १२वीपर्यंत शिकवण्यात यावा, असंही आयोगानं आपल्या अहवालात सुचवलं आहे.

<><><><>

९पेक्षा जास्त सिमकार्ड्स नावावर असलेल्यांना नवी मोबाईल कनेक्शन्स देऊ नयेत, अशा सूचना टेलिकम्युनिकेशन विभागाने टेलिकॉम ऑपरेटर्सना दिले आहेत. ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त सिमकार्ड्स घेता येऊ नयेत, यासाठी या महिन्याच्या २४ तारखेपासून कडक पावलं उचलायच्या सूचनाही विभागानं दिल्या आहेत.

<><><><>

आगामी सणासुदीच्या काळात साखरेचा पुरवठा नियमित ठेवण्याकरता केंद्र सरकारनं साखरेच्या देशांतर्गत साठ्यावर निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार १० टनांची मासिक उलाढाल करणाऱ्या घाऊक ग्राहकांना आता १५ दिवस पुरेल त्यापेक्षा जास्त साखरेचा साठा करता येणार नाही. येत्या १ सप्टेंबरपासून ३० नोव्हेंबरपर्यंत हा आदेश लागू राहील.

वार्षिक आकडेवारीच्या निकषांवर साखरेचे भाव १८ ऑगस्टपर्यंत १३ टक्क्यानं वाढले आहेत. तसंच येत्या १ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या हंगामात

साखरेच्या उपलब्धतेबद्दल अनिश्चितता आहे.  त्यादृष्टीनं हा निर्णय घेतला असून तो मिठाई, सॉफ्ट ड्रिंक, अन्नप्रक्रीया उद्योग, आणि इतर मोठ्या ग्राहकांना लागू राहील. सरकारी किंवा निमसरकारी संस्थांना हा निर्णय लागू नसेल.

गेल्या महिन्यात सरकारनं दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही वितरकाला ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी आवश्यक साठा ठेवता येणार नाही. तसंच जास्तीत जास्त ४ हजार क्विंटल साठवून ठेवता येईल, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सुटं किंवा आणि सीलबंद नसलेलं खाद्यतेल असुरक्षित असून त्यात भेसळ आढळल्यानं ग्राहकांनी ते खरेदी करू नये, असं आवाहन एफडीए, अर्थात अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केलं आहे. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. भेसळ, अयोग्य पॅकेजिंग आणि साठवणूक तसंच वाहतूक याबाबतच्या नियम उल्लंघनांच्या पार्श्वभूमीवर एफडीएनं खाद्यतेलासाठी नियम पालनाचे आदेश जारी केल्याचं ते म्हणाले. यात शेंगदाणा, मोहरी, सूर्यफूल, राईस ब्रान, पाम, नारळ आणि मका यांसारख्या तेलांचा समावेश आहे. खाद्य तेलाचा व्यवसाय करणाऱ्या सर्वांना हे आदेश लागू असतील. या आदेशामागचा उद्देशही मुंढे यांनी यावेळी स्पष्ट केला.

**होल्ड - बाईट- तुकाराम मुंढे**

सुट्या तेलाचं उत्पादन, त्याचा स्त्रोत याची कुठलीही माहिती स्पष्टपणे दिलेली नसल्यानं त्याचा मागोवा घेऊन कारवाई करणं कठीण असतं, त्यामुळे ते खरेदी करू नये, असं आवाहन मुंढे यांनी केलं. तसंच सीलबंद तेल खरेदी करताना त्याचं नाव, उत्पादन आणि समाप्तीची तारीख तपासावी, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणी नवी दिल्लीतल्या विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या पोलिसांच्या कारवाई प्रकरणाची चौकशी करण्यासाठीच्या उच्च स्तरीय समितीच्या सदस्यांची घोषणा सर्वोच्च न्यायालयानं आज केली. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली ही समिती असेल. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ल आणि मेघालयाचे माजी पोलीस महासंचालक एल. आर. बिश्नोई यांचाही या समितीत समावेश करण्यात आला आहे. या आंदोलनादरम्यान पोलिसी बळाच्या अवाजवी वापराबरोबरच आंदोलकांनी केलेला हिंसाचार, विशेषतः महिला आंदोलनकर्त्यांचा छळ आणि छेडछाडीच्या आरोपांची चौकशी ही समिती करेल.

<><><><><>

झारखंड लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परिक्षा उत्तीर्ण होऊन नोकरीत रुजू झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या रद्द करण्याच्या झारखंड राज्य सरकारच्या निर्णयाला झारखंड उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. ११ वी ते १३ वी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय न्यायालयानं स्थगित केला आहे. तसंच खाद्य सुरक्षा अधिकारी पदाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णयही न्यायालयानं स्थगित केला आहे. बया परीक्षांमधून ३४२ उमेदवार पात्र ठरले होते.

<><><><><>

काँग्रेस माजी नेते आणि माजी खासदार सज्जन कुमार यांचा मृत्यू झाल्याची माहिती दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयाने दिली आहे. १९८४ मधे दिल्लीत झालेल्या शीख विरोधी दंगलींप्रकरणी दोषी ठरल्यानं ते तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. तीन वेळा लोकसभेवर निवडून गेलेले सज्जन कुमार यांनी २०१८ मधे दोषी ठरल्यावर पक्षाचा राजीनामा दिला होता.

**<><><><><>**

गुजरातमधे भावनगर इथल्या बनावट दारू प्रकरणात मृतांची संख्या आता ७ झाली आहे. ३० जणांवर अद्याप रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी आतापर्यंत २१ जणांविरोधात एफआयआर दाखल झाला असून, १२ जणांना अटक केल्याचं भावनगरच्या पोलीस महानिरीक्षकांनी सांगितलं. गुजरात राज्यात दारूबंदी लागू असून मध्यप्रदेशातून ही दारू आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><><>**

अन्नपदार्थ आणि ग्राहकोपयोगी उत्पादनांचं परीक्षण करणाऱ्या राष्ट्रीय परीक्षण शाळेचा कायापालट करण्याच्या दृष्टीनं केंद्रीय अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहारमंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या सचिव निधी खरे यांच्याशी चर्चा केली. उत्पादनांचा दर्जा आणि सुरक्षिततेबाबत तडजोड होऊ नये याकरता संस्थेत मूलगामी बदल करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली. भारतीय अन्न महामंडळाशी संबंधित मुद्द्यांवर जोशी यांनी दुसरी बैठक घेतली.

**<><><><><>**

बांगलादेशात ३५ वर्षांनंतर झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर विजयी झाले आहेत. त्यांनी लिबरल डेमॉक्रॅटिक पार्टीचे अध्यक्ष आणि ११ पक्षांच्या विरोधी आघाडीचे उमेदवार ओली अहमद यांचा पराभव केला. आलमगीर यांना २५५, तर ओली यांना ८८ मतं मिळाल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त एम एम एम नसीरुद्दिन यांनी दिली. आलमगीर यांचा शपथविधी उद्या बंगभवनच्या दरबार हॉलमध्ये होणार आहेत.

**<><><><><>**

बॅडमिंटन विश्व चषक स्पर्धेत महिला दुहेरीत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं आज उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.  त्यांनी जपानच्या सातव्या मानांकित रिन इवानागा आणि की नाकानिशी यांचा २१-१६, २१-१२ असा सरळ गेम्समध्ये पराभव केला. नवी दिल्लीत इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर या स्पर्धा सुरू आहेत. महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीत पी व्ही. सिंधुला आज पराभव पत्करावा लागला. चीनच्या वांग झी यी हिनं तिला 11-21 21-15 17-21  असं पराभूत केलं.

//<><><><><>//